कार्यालय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, गडचिरोली.

क्रमांक स.अ.(बांध.)/१९९९/२०२५,दिनांक : ०६/०५/२०२५.

दरपत्रक/निवीदा सुचना

याद्वारे कळविण्यांत येते की, दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), गडचिरोली व मुख्य न्यायदंडाधिकारी, गडचिरोली यांचे न्यायदान कक्षातील इन्व्हर्टरकरिता खालील वर्णन केल्यानुसार ०४ बॅट-या स्थानिक बाजारातून खरेदी करावयाची असल्याने त्याबाबत ईच्छुक प्रतिष्ठानांनी सिलबंद निवीदा मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश गडचिरोली यांच्या नावाने **दिनांक १५/०५/२०२५** च्या सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत जिल्हा न्यायालय, गडचिरोली येथे सादर करण्यांत यावे. तसेच लिफाफ्यावर **" इन्व्हर्टर बॅट-या खरेदीबाबतची निविदा (बायबॉक पद्धतीने)"** असे नमुद करावे.

अ.क्रं.	विवरण	संख्या
१	INVERTER BATTERY 150 AH 12V Tubular (Exide Company)	०४ नग
२	बायबॉक जुन्या कालबाहय झालेल्या बॅट-या 150 AH 12V Tubular Batteries	०४ नग

अटी व शर्ती :-

१. वरील विवरणामध्ये नमुद केलेल्या इन्व्हर्टर बॅट-या स्पेशिफीकेशनप्रमाणे जिल्हा न्यायालयात पुरवठा करणे अनिवार्य राहील. व त्यांचे दर सर्व करासहीत असले पाहीजे.(Including or Excluding) याप्रमाणे निवीदामध्ये स्पष्टपणे नमूद करावे.

२. निवीदामध्ये इन्व्हर्टर बॅट-याचा गॅरंटी कालावधी स्पष्टपणे नमूद करणे अनिवार्य आहे.

३. इन्व्हर्टर बॅट-याचे गॅरंटी व वारंटी कार्ड जिल्हा न्यायालयात जमा करणे आवश्यक राहील.

४. इन्व्हर्टर बॅट-यांच्या गॅरंटी व वारंटी कालावधीमध्ये काही बिघाड निर्माण झाल्यास किंवा बॅट-या व्यवस्थित कार्य करीत नसल्यास, तक्रार केल्यापासुन दहा दिवसांचे आत नवीन बॅटरी पुरविणे आवश्यक राहील.

५. कोणत्याही प्रकारचे आगाऊ रक्कमेचे प्रदान केले जाणार नाही.

६. वरिल साहित्य पुरविण्याचे आदेश दिल्यास, दिलेल्या मुदतीतच पुरविले पाहीजे अन्यथा आदेश रद्द समजण्यात येईल याची जबाबदारी संबंधीत प्रतिष्ठानाची राहील.

७. बायबॉक जुन्या कालबाहय झालेल्या बॅट-या चे दर वेगळे दर्शविणे आवश्यक आहे.

८. सदरहू नमूद साहित्यांचा पुरवठा जिल्हा न्यायालय येथे करणे अनिवार्य असुन स्थापीत करुन देण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. त्याकरीता वेगळा खर्च मिळणार नाही.

९. निवीदा कोणत्याही कारणास्तव रद्द करणे किंवा मागणी संख्येत वाढ किंवा घट करणे याबाबतचा पुर्ण अधिकार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश गडचिरोली यांना राहील.

१०. साहित्याचा पुरवठा विहीत मुदतीत केल्यानंतर व साहित्य सुस्थितीत पुरवठा झाल्याची कार्यालयास खात्री पटल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनूसार रक्कमेचे प्रदान केल्या जाईल

११. दरपत्रकामध्ये जि.एस.टी. क्रमांक नमुद करावे तसेच सोबत पॅन कार्ड तसेच स्थानिक प्रशासनाचे व्यवसाय प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडावी अन्यथा दरपत्रक/निवीदा रद्द करण्यात येईल.

आदेशान्वये,

6/5/25

प्रभारी प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, गडचिरोली

...२...

टेंडर नोटीसची प्रत बेलीफामार्फत जिल्हा न्यायालयाचे नोटीस बोर्डावर व जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रकाशीत करण्यात यावी.

प्रभारी प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, गडचिरोली